सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे**

**४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,**
**मॉडेल कॉलनी , बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे -४११०१६**

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा. क्र : तंशिविकापु/शै.वि४/२०२४/ 3949 दिनांक : -3 OCT 2024

**परिपत्रक**

**प्रति,**
प्राचार्य/संचालक
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
सर्व संस्था, पुणे विभाग.

**विषय : राज्यातील सर्व विद्यापीठ व शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी विविध व्यावसायिक पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी निश्चित केलेल्या शुल्काची माहिती महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर व आवारातील सूचना फलकावर प्रसिद्ध करण्याबाबत.**

संदर्भ : १. संचालनालयाचे पत्र क्र.२/एनजीसी/शिक्षण शुल्काची माहिती/२०२४/७८० दि.२४.०९.२०२४
२. मा. संस्थापक अध्यक्ष, दीप फाऊंडेशन, पुणे यांचे दि.१६.०९.२०२४ रोजीचे निवेदन

उपरोक्त विषयाच्या अनुसरून संचालनालयाचे पत्र या कार्यालयास प्राप्त झाले असून सदर पत्राच्या अनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व संस्थांना कळविण्यात येते की, पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना संबंधित विद्यापीठ/महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई तसेच शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई/ फी निश्चिती समिती, मुंबई यांनी निश्चित केलेल्या शुल्काची आकारणी करणे बंधनकारक आहे.

यास्तव सर्व तांत्रिक व्यावसायिक पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांनी **विद्यापीठ/महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई तसेच शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई/फी निश्चिती समिती, मुंबई यांनी निर्धारित केलेले शुल्क व इतर शुल्क याची माहिती तात्काळ महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर व सूचना फलकावर प्रसिद्ध करावे.**

सोबत- संदर्भिय पत्र

**( डॉ. द. व्यं. जाधव )**
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे.

प्रत- या कार्यालयातील प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरिता.

महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४५०, ४४२, ४४३
ई-मेल - desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : http://dte.maharashtra.gov.in

क्र. २/एनजीसी/शिक्षण शुल्काची माहिती/२०२४/ ७८० दिनांक : 24 SEP 2024

प्रति,

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे/ नाशिक/ छत्रपती संभाजीनगर/ अमरावती/ नागपूर

संचालक,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

**विषय : राज्यातील सर्व विद्यापीठ व शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी विवीध व्यावसायिक पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी निश्चित केलेल्या शुल्काची माहिती महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर व आवारातील सूचना फलकावर प्रसिध्द करण्याबाबत...**

संदर्भ : मा.संस्थापक अध्यक्ष, दीपू फाऊंडेशन, पुणे यांचे दि.१६.९.२०२४ रोजीचे निवेदन

संदर्भाकित पत्रांच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या विभागांतर्गत पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना संबंधित विद्यापीठ / महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई तसेच शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई / फी निश्चिती समिती, मुंबई यांनी निश्चित केलेल्या शुल्काची आकारणी करणे बंधनकारक आहे.

सबब आपल्या विभागाच्या कार्यकक्षेतील सर्व तांत्रिक व्यावसायिक पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थानां विद्यापीठ / महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई तसेच शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई / फी निश्चिती समिती, मुंबई यांनी निर्धारीत केलेले शुल्क व इतर शुल्क महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर व सूचना फलकावर प्रसिद्ध करण्याबाबत कळविण्यात यावे. तशा सूचना आपल्या स्तरावरून सर्व संस्थांना विनाविलंब देण्यात याव्यात.

(डॉ.सुनिल भामरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : माहितीकरीता सादर

१) मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ३२
२) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठ/ अभिमत विद्यापीठे/स्वयं अर्थसहायित विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
३) मा.संस्थापक अध्यक्ष, दीपू फाऊंडेशन, पुणे यांना ई-मेलव्दारे (आय.डी- deepufoundation1984@gmail.com)

D:\DTENS1_Backup 1८ Dec २०२३\२०२४\General Correspondence\RO Letter_Fee display on institute website.docx